# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०६/०८/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत १२ कि.मी अंतरावर खापा फाटा ॲटो स्टॅन्ड पाटणसांवगी येथे दिनांक ०६/०८/२०२२ चे ०९/३० वा. दरम्याण मोरेश्वर दादुजी गायकवाड वय ४५ वर्ष रा.वाकोडी तह.सावनेर जि. नागपुर हे त्यांचा मालकीची एम.एच.४०/के.आर—०१६६ क्रमांकाचा टाटा मॅजीकने पाटणसांवगी येथील आरामशीन मधुन लाकडी पाटया घेवुन वाकोडी येथे जात असंताना खापा फाटा पाटणसांवगी येथे ॲटो चालक आरोपी नामे— नसीर वल्द अब्दुल शॅहा बानवा, वय ४८ वर्ष, रा.वार्ड नं ४ पाटणसांवगी तह.सावनेर जि. नागपुर याने 'फिर्यादीशी माझे नंबर असतांना तु सवारी कसे काय नेत आहे' या कारणावरून भांडण केले व फिर्यादिला जिवे मारण्याचा उद्देशाने फिर्यादिचा छातीचा डावे बाजुच्या वरच्या भागावर चाकु ने वार करून गंभीर जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री निशांत फुलेकर मो.नं. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

### जबरी चोरी

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील राजीक (पान पॅलेस) ची दुकान समोर, धरम नगर, कन्हान येथे दिनांक ०५.०८.२०२२ चे २२.३० वा. ते २३.०० वा. पर्यंत फिर्यादी नामे— शिवम बलीराम पुरी, वय १७ वर्ष, रा. शिवाजी नगर आसीफ भाई च्या घरा समोर, कन्हान हा पानठेल्यावर खर्रा घोटायचे काम करतो. फिर्यादी हा पानठेल्या वरून घरी जात असता जुन्या वादाच्या कारणावरून आरोपीं १) शुभम पतीराम सलामे, वय २८ वर्ष, २) प्रशांत बबल सारवे, वय १९ वर्ष, दोन्ही रा. शिवाजी नगर, कन्हान ३) अक्षय रा. कन्हान व एक विधीसंघर्ष बालक वय १७ वर्ष यांनी फिर्यादीस राजीकचे दुकानाजवळ थांबवुन आरोपी क्रमांक १ ने फिर्यादीचे कॉलर पकडुन त्याचा मोबाईल हिसकावुन चाकुने धमकावले तसेच क्र. १ ते ४ पैकी एका आरोपीने खिशातील १४,०००/—रू. काढुन घेतले व फिर्यादीने पळण्याचा प्रयत्न केला असता त्याला चाकू फेकुन मारला परंतु तो फिर्यादीला लागला नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३९२, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १ व २ ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री कदम मो.क्र. ७०८३७११९६९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर